| MHDH030061232025 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११२१/२०२५**<br>**मन्यार शेख आबिद शेख कादर**<br>**वि.**<br>**महाराष्ट्र शासन वगैरे** |
|---|---|

## निशाणी क्रमांक १ खालील अंतिम आदेश

प्रस्तुत अर्ज **मन्यार शेख आबिद शेख कादर** यांनी त्यांचे बँक खात्यातून वर्ग झालेल्या खालील रकमा ह्या भा. ना. सु. सं. चे कलम ५०३ अन्वये अर्जदार यांना योग्य त्या रक्कमेच्या अंतरीम बॉण्डवर परत मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

| **बँकेचे नाव** | **आय.एफ.सी.कोड** | **खाते क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| Bank of Baroda | BARB0BLYMOR | 27058100026026 | 402/- |
| The Federal Bank ltd | FDRL001131 | 11310100174465 | 1892/- |
| HDFC Bank ltd | HDFC0000020 | 50100305455848 | 6313/- |
| The Kerala State Co-Operative Bank ltd. | KSBK0001301 | 130112309200107 | 4712/- |
| State Bank of India | SBIN0020190 | 33390738559 | 2438/- |
| | | **एकुण** | **15757 /-** |

**अर्जातील कथन थोडक्यात खालील प्रमाणेः-**

२. अर्जदार हा गहा नगर ता. शिरपूर जि. धुळे येथील रहिवासी आहे. अर्जदाराचे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा - नेहरू मार्ग शिरपूर, येथे बचत खाते क्र.३०३७४१४५५०७ असे असून त्याचा IFSC Code SBIN0000482 आहे. त्यानंतर फसवणूक झाल्याचे अर्जदार यांना लक्षात आले व अर्जदार यांनी दि.२०.१२.२०२४ रोजी ॲकनॉलेजमेंट क्रमांक २१९०२२५००१८४६० ऑनलाईन तक्रार केल्याने सायबर सेल पोलीस स्टेशन, धुळे ता.जि. धुळे येथे गुन्हा दाखल केला.

३. अर्जदाराच्या पुढील म्हणण्यानुसार, त्यानंतर सदर तक्रारीची चौकशी सायबर सेल, पोलीस करीत असतांना त्यांनी बँक खाते फ्रिज केलेले आहे व सदरची रक्कम हस्तगत केली आहे व सदर रक्कम अर्जदाराची असून ती अर्जदारास मिळणे आवश्यक आहे. सदरहु गोठवण्यात आलेली रक्कम तात्पुरत्या स्वरुपात वर्ग होणेबाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला

आहे.

४. सदरच्या अर्जावर निशाणी क्र. १ वर सरकारी वकीलांनी म्हणणे दाखल केलेले आहे. सरकारी वकील असे कथन करतात की, आवश्यक त्या पडताळणीनंतर योग्य ते आदेश पारीत करण्यात यावेत, अशी विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जावर तपासी अंमलदार यांनी निशाणी क्रमांक ४/क वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे की, उपरोक्त नमुद गुन्हयात अर्जदार यांचे बॅक खात्यातून ऑनलाईन पध्दतीने वळविण्यात आलेले रक्कम योग्य त्या अटी व शर्तींवर परत करणेबाबत योग्य ते आदेश होणेस विनंती आहे.

६. अर्जदाराने त्याचे कथनाचे समर्थनार्थ त्याने दाखल केलेल्या ऑनलाईन तक्रार क्रमांक २१९०२२५००१८४६० च्या अर्जाची प्रत, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रत, अर्जदाराच्या बँक खात्याचे पासबूक दाखल केलेले आहे.

७. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता अर्जदाराचे खात्यातुन एकुण रक्कम रू. १५७५७/- ऑनलाईन पध्दतीने वर्ग झाल्याचे दिसते. तपासी अधिकारी यांनी निशाणी क्रमांक ४/डी वर दाखल केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये अर्जदाराच्या खाते क्रमांक ३०३७४१४५५०७ या खात्यामधून वर नमूद रकमा आरोपी यांचे खालीली बँक खातेमध्ये गोठविण्यात आलेल्या आहेत.

| **बँकेचे नाव** | **आय.एफ.सी.कोड** | **खाते क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| Bank of Baroda | BARBOBLYMOR | 27058100026026 | 402/- |
| The Federal Bank ltd | FDRL001131 | 11310100174465 | 1892/- |
| HDFC Bank ltd | HDFC0000020 | 50100305455848 | 6313/- |
| The Kerala State Co-Operative Bank ltd. | KSBK0001301 | 130112309200107 | 4712/- |
| State Bank of India | SBIN0020190 | 33390738559 | 2438/- |
| | | **एकुण** | **15757 /-** |

त्यामुळे वरील गोठवण्यात आलेल्या रकमा अर्जदाराचे बँक खात्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणे न्यायोचित होईल. सदर रक्कम अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तींवर परत देण्याबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे.

०८. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ चे अवलोकन केले असता जेव्हा जेव्हा

कोणताही पोलीस अधिकारी यांनी संपत्तीचे अधिग्रहण केल्याचे वृत्त या संहितेच्या उपबंधाखाली दंडाधिकारी यांना कळविण्यात आले असेल व चौकशी किंवा संपरिक्षेत अशी संपत्ती फौजदारी न्यायालयात आणली गेली नसेल तेव्हा अशा संपत्तीची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सपुर्दगी करणे याबाबत दंडाधिकारी आदेश देवू शकतील. अशा परिस्थितीत जप्त मुद्देमाल हा अर्जदारास देणे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये योग्य होईल.

०९. वरील सर्व बाबींचा विचार करता, अर्जदाराकडून ऑन लाईन पध्दतीने वर्ग झालेली रक्कम व तपासी अधिकारी यांचे लेखी खुलाशाप्रमाणे पूर्ण तपशिलासह गोठवण्यात आलेल्या रक्कमा अर्जदाराचे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा –नेहरू मार्ग, शिरपूर,येथे खाते क्र. ३०३७३१४५५०७ या खात्यात काही अटी व शर्तीच्या सुपूर्दनाम्यावर वर्ग करणे न्यायोचित होईल, म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापक, यांना कळविण्यात येते की,

| **बँकेचे नाव** | **आय.एफ.सी.कोड** | **खाते क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| Bank of Baroda | BARB0BLYMOR | 27058100026026 | 402/- |
| The Federal Bank ltd | FDRL001131 | 11310100174465 | 1892/- |
| HDFC Bank ltd | HDFC0000020 | 50100305455848 | 6313/- |
| The Kerala State Co-Operative Bank ltd. | KSBK0001301 | 130112309200107 | 4712/- |
| State Bank of India | SBIN0020190 | 33390738559 | 2438/- |
| | | **एकुण** | **15757 /-** |

उपरोक्त खात्यांवर फ्रीज होल्ड असलेली रक्कम ही अर्जदार मन्यार शेख आबिद शेख कादर यांच्या एच.डी.एफ.सी. बँक, स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा – नेहरू मार्ग, शिरपूर,येथे खाते क्र. ३०३७३१४५५०७ या खात्यात वर्ग करावी व सदर खात्यात रक्कम वर्ग होईपावेतो उपरोक्त नमूद सर्व बँक व्यवस्थापक, यांनी आपआपले बँक खाते क्रमांक पूर्ववत सुरु करावे व सदर रक्कम अर्जदार यांचे उपरोक्त नमुद खात्यामध्ये वर्ग झाल्यानंतर पुन्हा सदर खाते हे तपासी अधिकारी

| | |
|---|---|
| | सायबर सेल, धुळे यांना आवश्यकता आहे तोपर्यंत फ्रिज करण्यात यावे व त्याबाबत पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, धुळे यांना लेखी कळवावे. |
| ४. | अर्जदार यांचे खात्यामध्ये सदरची रक्कम ही अंतरिम स्वरुपात वर्ग झालेली असणार आहे याची अर्जदार याने नोंद घ्यावी. तसेच, सदरची रक्कम अर्जदार याचे खात्यात अंतरिम स्वरुपात वर्ग झाल्यानंतर अर्जदार याने पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, धुळे यांना रक्कम रुपये १५७५७/- चे बंधपत्र लिहून दयावे. |
| ५ | अर्जदार याने उपरोक्त नमुद रक्कम त्याचे खात्यामध्ये अंतरिम स्वरुपात वर्ग झाल्यानंतर त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा -नेहरू मार्ग, शिरपूर,येथे खाते क्र. ३०३७३१४५५०७ चा प्रमाणित केलेला संगणकीय खातेउतारा पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, धुळे यांच्याकडे बंधपत्रासोबत जमा करावा. |
| ६ | न्यायालय आदेश देईल त्या-त्या वेळी अर्जदार याने सदरची अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेली रक्कम न्यायालयासमक्ष हजर करावी. |
| ७ | सदर अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेल्या रक्कमेबाबत न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे अर्जदार याने काटेकोरपणे पालन करावे. |
| ८ | वरील अटी व शर्तींचा अर्जदार याचेकडुन भंग झाल्यास त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल व त्याचेकडुन बंधपत्रातील रक्कम वसूल करण्यात येईल. |
| ९ | सदर गुन्ह्यातील तपास अधिका-यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अंतरिम स्वरुपात वर्ग करण्यात आलेल्या रक्कमेबाबतच्या कागदपत्रांचा सविस्तर पंचनामा तयार करुन तो दोषारोप पत्रासोबत दाखल करावा. |
| १० | सदर आदेशाची प्रत मुळ खटल्यासोबत ठेवावी. |
| ११ | याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात यादी पाठवावी. |

MADHURI ASHOK CHAUDHARI

Digitally signed by MADHURI ASHOK CHAUDHARI
Date: 2026.08.07 18:01:28 +0530

धुळे.
दिनांक- ०६.०८.२०२६

( मा. अ. चौधरी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे
(न्यायालय क्रमांक ३)

– **<u>प्रमाणपत्र</u>** –

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– पी. पी. सोनवणे |
| न्यायालयाचे नांव | :– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे (न्यायालय क्रमांक ३) |
| पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक | :– / / २०२६ |

सही/–
लघुलेखक